




दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : २५१ ● पुणे ● शनिवार, दि. २३ ऑगस्ट २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313


## ठळक बातम्या

### थकबाकी वसुलीसाठी कडक पावले

पुणे (आरंभ पर्व): महापालिका प्रशासनाकडून मिळकतकर भरण्यासंदर्भात वारंवार सूचना देऊनही एकूण मिळकतकरधारकांपैकी सुमारे साडेसात लाखइतक्या मालमत्ताधारकांकडून मिळकतकर भरण्याकडे पाठ फिरवली जात आहे. त्यामध्ये शासकीय संस्थांसारख्या थकबाकी न मिळणाऱ्यांची संख्या अधिक आहे. असे असले तरीही हजारो कोटी रुपये मिळकतकराच्या थकबाकीचा महसूल तिजोरीत येण्यासाठी महापालिकेने आता कंबर कसली आहे. त्यासाठी मालमत्ता जप्ती, नळजोड तोडणे, लिलावासारख्या कारवाईवर भर देण्यासह अधिकाऱ्यांची नेमणूक करून त्यांना थकबाकी गोळा करण्यासाठीचे लक्ष्य देण्यावर आता भर देण्यात आला आहे.

### ‘किसान कॉल सेंटर’ सुरू करणार

पुणे (आरंभ पर्व) : “शेतकरी जेव्हा संकटात असतो, तेव्हा त्याला त्वरित सल्ला आणि मदतीची गरज असते. त्यासाठी एक समर्पित कॉल सेंटर आवश्यक आहे. शेतकऱ्यांना तातडीने मार्गदर्शन मिळावे, यासाठी ‘किसान कॉल सेंटर’ सुरू करावे,” अशी सूचना कृषिमंत्री दत्तात्रेय भरणे यांनी कृषी खात्याला केली. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत, अशी सूचनाही त्यांनी या वेळी केली. कृषी मंत्रिपदाचा कार्यभार हाती घेतल्यानंतर भरणे यांनी वैकुंठ मेहता राष्ट्रीय व्यवस्थापन संस्थेत विभागाची बैठक घेतली. या वेळी कृषी विभागाचे प्रधान सचिव, कृषी आयुक्त यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. भरणे म्हणाले, “शेतकऱ्यांचे हित हाच कामाचा केंद्रबिंदू असला पाहिजे. शेतकरी जगला, तरच देशाचा विकास होईल. त्यामुळे कृषी योजनांची आखणी करताना शेतकऱ्यांच्या गरजांचा विचार केंद्रस्थानी असला पाहिजे. नवीन तंत्रज्ञानाचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न कृषी विभागाने करावा. विभागाच्या डिजिटायझेशनवर भर देण्यात यावा.”

### कधी लागणार SET निकाल?

पुणे (आरंभ पर्व) : विद्यापीठ अनुदान आयोग(UGC) च्या वतीने , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत SET 2025 परीक्षा 15 June रोजी आयोजित करण्यात आली होती. परंतु, तब्बल दोन महिने उलटून देखील निकाल जाहीर न झाल्याने विद्यार्थी निकालाच्या प्रतिक्षेत आहेत. महाराष्ट्र व गोवा राज्यातील 1 लाख 10 हजार 412 अधिकृत उमेदवारांपैकी 90 हजार 446 उमेदवारांनी म्हणजे 82% उमेदवारांनी ही परिक्षा दिली आहे. UGC च्या नियमांनुसार सहाय्यक प्राध्यापक म्हणून रुजू होण्यासाठी SET परीक्षा पात्र असणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र व गोवा राज्यांसाठी पुणे विद्यापीठामार्फत ही परीक्षा घेतली जाते. निकाल वेळेत जाहीर न झाल्याने विद्यार्थी संघटनांनी निवेदने दिल्यानंतर प्रशासनाने जाहीर प्रकटन प्रसिद्ध करत, 40 व्या सेट परिक्षेसाठी SBC प्रवर्गासाठी आरक्षण लागू करायचे की नाही याबाबत पत्रव्यवहार महाराष्ट्र शासनाकडे केला असल्याची माहिती दिली आहे. SET विभागामध्ये संपर्क साधला असता, शासनाकडून आरक्षणासंदर्भात स्पष्टोक्ती झाल्यावर निकाल प्रसिद्ध होईल असे त्यांनी सांगितले. "सेट विभाग हा पुर्णपणे संशयाच्या भोवऱ्यात सापडलेला आहे.

# पुणे महापालिकेच्या वॉर्ड रचनेचा प्रारुप आराखडा जाहीर

## ४१ प्रभाग, १६५ नगरसेवक, नागरिकांकडून हरकती मागविल्या

- **धायरी प्रभाग रचनेवरून रणकंदन!**
- **सर्वपक्षीय नेत्यांचा प्रशासनावर निषेध, हरकतींचा पाऊस पडणार निश्चित**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे. त्यानुसार पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी वॉर्ड रचनेचा प्रारुप आराखडा जाहीर करण्यात आला आहे. या नव्या आराखड्यानुसार पुणे महानगरपालिका क्षेत्रात एकूण ४१ प्रभागांची रचना करण्यात आली असून, यापैकी ४० प्रभाग चार सदस्यीय आणि एक प्रभाग पाच सदस्यीय असेल. २०११ च्या जनगणनेनुसार पुणे महानगरपालिकेची लोकसंख्या ३४,८१,३५९ इतकी आहे. यापैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या ४,६८,६३३ तर अनुसूचित जमातीची लोकसंख्या ४०,६८७ आहे. या लोकसंख्येनुसार पुणे महापालिकेसाठी १६५ नगरसेवक निवडले जाणार आहेत. विशेष म्हणजे, प्रभाग क्र. ३८ हा पाच सदस्यीय ठेवण्यात आला असून उर्वरित ४० प्रभाग चार सदस्यीय आहेत.

प्रभाग रचनेच्या या प्रारुप आराखड्यावर नागरिकांच्या हरकती व सूचना स्वीकारल्या जाणार आहेत. त्या २२ ऑगस्ट २०२५ ते ३ सप्टेंबर २०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत आणि ४ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत लेखी स्वरूपात देता येतील. यासाठी पुणे मनपा भवनातील स्वागत कक्ष, मनपाची सर्व क्षेत्रीय कार्यालये तसेच निवडणूक कार्यालय (स्वा.वि.दा. सावरकर भवन) येथे सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

**आम आदमी पार्टीचे शहराध्यक्ष धनंजय बेनकर म्हणाले, "भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास न करता ही प्रभाग रचना करण्यात आली आहे. समाविष्ट गावे योग्य पद्धतीने जोडायला हवी होती. ही चुकीची रचना प्रशासनाने तात्काळ दुरुस्त करावी."**

## इतर महापालिकांची प्रभाग रचना लवकरच

**राज्य निवडणूक आयोगाने मुंबई महापालिका तसेच गट अ, ब आणि क वर्गातील महापालिकांची प्रभाग रचना २५ ऑगस्टला जाहीर करणार असल्याचे संकेत दिले होते. मात्र काही महापालिकांचे प्रस्ताव उशिरा प्राप्त झाल्यामुळे प्रभाग रचना सोमवारी प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत २९ पैकी १० महापालिकांचे प्रभाग रचना प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे पोहोचले आहेत, तर गट ड मधील महापालिकांचे प्रस्ताव संबंधित महानगरपालिकांकडून हळूहळू मिळत आहेत. मुंबई, नागपूर, पुणे, ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, वसई-विरार आणि नवी मुंबई या महापालिकांच्या रचना आयोगाकडे प्राप्त झाल्या आहेत. आयोगाकडून सोमवारी या महापालिकांच्या प्रभाग रचना जाहीर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.**

**पुणे महानगरपालिकेची प्रारूप प्रभाग रचना आयुक्त नवल राम किशोर यांनी जाहीर केली असून, या रचनेबाबत धायरी परिसरात प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे. भौगोलिक परिस्थितीचा विचार न करता प्रभागांचे तुकडे करण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिक व सर्वपक्षीय नेत्यांकडून होत असून, प्रशासनाच्या या निर्णयाचा निषेध व्यक्त केला जात आहे. मोठी मतदारसंख्या असलेला धायरी भाग दोन प्रभागांमध्ये विभागण्यात आला आहे. प्रभाग क्रमांक ३३ व ३४ मध्ये धायरी समाविष्ट करण्यात आली असून, याशिवाय खडकवासला-शिवणे व नरे-वडगाव या प्रभागांमध्येही धायरीचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे या भागाचा राजकीय व सामाजिक समतोल बिघडल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. "धायरीचा तीन तेरा वाजवला आहे," अशा प्रतिक्रिया नागरिक व कार्यकर्त्यांकडून येत आहेत.**

**निलेश द. मिस्टे यांनी प्रशासनावर गंभीर आरोप करताना म्हटले, "धायरी ही राजकीय दृष्ट्या मजबूत मानली जाते. येथे मोठी मतदारसंख्या आहे तसेच वारसा आहे. मात्र धायरीचा प्रभाग तुकडे करून किंवा नाव वगळून 'हातरधारीचे वैभव संपवण्याचा' घाट घातला आहे. हा प्रशासनाचा डाव असून, सर्वपक्षीयांनी मिळून तो हाणून पाडला पाहिजे."**

**दरम्यान, गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने जनतेची कामे करणाऱ्या स्थानिक लोकप्रतिनिधींमध्येही अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली आहे. या प्रभाग रचनेवर हरकतींचा पाऊस पडणार हे निश्चित असून, पुढील सुनावणीनंतरच अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे. तोवर धायरीमध्ये "कभी खुशी, कभी गम" असे राजकीय वातावरण पाहायला मिळत असून, ही प्रभाग रचना कोणाच्या फायद्यासाठी व कशासाठी केली, याकडे संशयाने पाहिले जात आहे.**

## ‘हनी ट्रॅप’ प्रकरणातील प्रफुल्ल लोढा पोलिसांच्या ताब्यात

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**
‘हनी ट्रॅप’ तसेच अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी प्रफुल्ल लोढा याला पिंपरी-चिंचवड पोलिसांनी शुक्रवारी (ता. २२) ऑर्थर रोड जेलमधून ताब्यात घेतले. न्यायालयाने त्याला सोमवारपर्यंत पोलिस कोठडी दिली. कोथरूडमधील ३६ वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. त्यावरून पोलिसांनी लोढावर (वय ६२, रा. जामनेर, जि. जळगाव) १७ जुलैला बावधन पोलिस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल केला. पतीला नोकरी लावण्याच्या आमिषाने त्याने २७ मे महिलेला बालेवाडीतील येथील एका हॉटेलमध्ये बोलावून घेतले. त्याने शरीरसंबंधांची मागणी केली. महिलेने नकार दिला असता तिचीही नोकरी घालविण्याची धमकी देत लोढाने जबरदस्ती केली.



याआधी लोढावर मुंबईतील अंधेरी एमआयडीसी आणि साकीनाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात त्याला अटक झाली होती. बावधन पोलिस ठाण्यातही गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी त्याच्या हस्तांतरासाठी मागणी केली होती, अशी माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक अनिल विभूते यांनी दिली.

## जनता वसाहतीतील टीडीआर घोटाळ्यावर वाद; प्रस्ताव स्थगित

### अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का?

**पुणे-प्रतिक गंगणे (दै. आरंभ पर्व)**
पर्वती पायथ्यालगत असलेल्या जनता वसाहत झोपडपट्टीखाली जागा ताब्यात घेऊन त्या मोबदल्यात ‘टीडीआर’ देण्याच्या प्रस्तावावरून वादंग निर्माण झाल्यानंतर गृहनिर्माण विभागानेच एक पाऊल मागे घेतले आहे. या प्रकरणाचा सविस्तर अहवाल तत्काळ सादर करावा, तोपर्यंत प्रस्तावावर कोणतीही पुढील कारवाई करू नये, असे आदेश गृहनिर्माण विभागाने झोपडपट्टी पुनर्वसन विभागाला पत्राद्वारे दिले आहेत.

राज्य सरकारच्या गृहनिर्माण विभागाचे कार्यासन अधिकारी गजानन दाभिळकर यांनी याबाबतचे पत्र प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठविले आहेत. सदरच्या जागेवरील संपूर्ण क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले आहे का, तेथील आरक्षित व अतिक्रमित जागेचा रेडी-रेकनरमधील दर पाच हजार ७२० रुपये प्रतिचौरस फूट असताना ३९ हजार ६५० रुपये प्रतिचौरस फूट दराने त्यांची आकारणी करण्यात आली आहे, त्याचा खुलासा करावा. त्याचबरोबरच त्या जागेचा मागील पाच वर्षांतील रेडी-रेकनरचा दर काय होता, तसेच या प्रकरणासंदर्भात वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या आणि झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रात काम करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांकडून आलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करून हा अहवाल देण्यास प्राधिकरणाला सांगण्यात आले आहे. जनता वसाहत झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाबाबत राज्य सरकारच्या गृहनिर्माण विभागाने प्राधिकरणाला आदेश देऊन यासंदर्भातील अहवाल मागविला आहे. वास्तविक हा प्रस्ताव ‘एसआरए’ने मान्यता देऊन यापूर्वीच अंतिम मान्यतेसाठी गृहनिर्माण विभागाकडे पाठविला होता. गृहनिर्माण विभागानेही त्यास अंतिम मान्यता दिली आहे.



वाद झाल्यानंतर आता गृहनिर्माण विभागाने हात वर करीत प्राधिकरणाकडून अहवाल मागविला आहे.









# गोबेल्सचा अवतार

गोबेल्स दुसऱ्या महायुद्धाच्या काळात होऊन गेला असला, तरीही त्याचे खोटा प्रचार आणि सातत्याने तेच ते बरळणे जगाच्या इतिहासात कायम राहिले आहे. या गोबेल्सचे नवे अवतार आहेत, आपले ५५ वर्षांचे युवराज राहुल गांधी. त्यांनी भाजपवर मतचोरीचा आरोप करताना सारख्या त्याच त्याच गोष्टी सांगण्याचा सपाटा लावला आहे आणि कालांतराने सातत्याने तेच तेच बोलत राहिल्याने लोकांनाही त्यात तथ्य आहे असे वाटू लागण्याचा संभव आहे. गोबेल्स असाच यशस्वी झाला होता. राहुल यांना ठाऊक आहे, आपला पक्ष लोकांमध्ये निवडून येऊ शकत नाही आणि त्यामुळे भाजपवर सातत्याने आरोप करत राहणे हेच एक त्यांनी मूलमंत्र म्हणून स्वीकारले आहे. राहुल यांनी मतचोरीचा आरोप केल्यानंतर भाजपने त्याची तपासणी केली असता त्यातील काही आरोप निव्वळ चुकीचे आहेत असे दिसून आले आहे. महादेवपुरा या कर्नाटकातील मतदारसंघात घोटाळा झाल्याचा आरोप राहुल यांनी केला. पण महादेवपुरातच नव्हे तर इतर चार मतदारसंघांत काँग्रेसने आघाडी घेतली आहे. राहुल यांच्या सततच्या आरोपांमुळे भाजपही आक्रमक झाला असून मुख्यमंत्री फडणवीस यानी राहुल यांच्या मेंदूतील चिपची चोरी झाली आहे असा आरोप केला आहे. मतांची चोरी करून भाजप सत्तेत आला आहे, हा राहुल गांधी यांचा आरोप आहे. त्याच्या निवडणूक आयोगाने ठिकऱ्या उडवल्या आहेत. महाराष्ट्र विधानसभा ही राहुल यांची प्रयोगशाळा आहे. त्यांनी महाराष्ट्रात मतदारांची संख्या वाढली आणि त्याचा फायदा भाजपला झाला असा आरोप केला होता. पण त्यातील हवाही निवडणूक आयोगाने काढली आहे. शकुन राणी यांच्यावर राहुल यांनी आरोप केला होता, की त्यांनी दोन वेळेस मतदान केले. त्या राणी यांनी आपण एकदाच मतदान केले, असे सागितले आहे. निवडणूक आयोगाने राहुल यांना या आरोपाबाबतची अधिक माहिती सादर करण्यास सांगितले आहे. त्यातच राहुल यांची हवा गेली आहे. पण, 'गिरे तो भी टांग उपर' या न्यायाने राहुल कबूल करणार नाहीत आणि आयोगावर आणि भाजपवर



आरोप करत राहणार हे सत्य आहे. वास्तविक राहुल हे भाजपच्या विजयाने अस्वस्थ झाले आहेत आणि त्यांनी आपल्या पूर्वाश्रमीच्या विरोधी पक्षांप्रमाणे जनतेत जाऊन काम करणे अपेक्षित आहे. पण ते न करता भाजप आणि आयोगावर आरोप करत राहणे हा त्याचा रडीचा डाव आहे. राहुल सातत्याने तो खेळ खेळत आले आहेत आणि युवराज असल्याने सर्व जनता आपल्या मागे असल्याचा भ्रम त्यांना आहे. पण तसे असते, तर निवडून पुरेसे संख्येने का आले नाहीत? या प्रश्नाचे उत्तर राहुल यांच्याकडे नाही. राहुल यांना एकच माहीत आहे, की गोबेल्सप्रमाणे एकच गोष्ट वारंवार सांगितल्याने ती आज ना उद्या जनतेला पटल्याशिवाय राहणार नाही. पण तसे होत नाही आणि गोबेल्सच्या बाबतीतही ते झाले नव्हते. राजकारणात खोटेपणा काही मर्यादेपर्यंत केला जातो. पण, कायमस्वरूपी तो चालत नाही आणि करताही येत नाही. राहुल यांच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्ष सातत्याने नौटंकी करत आहेत. कधी लोकसभेत व्होट चोरीचा आरोप करतात, तर कधी बिहारच्या मतदार याद्यांच्या पडताळणीत बोगस मतदारांची नावे शोधून त्यांना वगळण्यात येत असल्याने काँग्रेस आणि राजद हे अस्वस्थ झाले आहेत. मग हा प्रयोगच कसा फसवा आहे ते सांगणे. कारण हेच दोन पक्ष आहेत, की ज्यांना या मतदारांच्या नावाने गोंधळ घालता येत होता. आपल्या आरोपांची जनता गंभीर दखल घेत नाही हे पाहून विरोधकांनी संसदेवर मोर्चा काढला. हे देशविरोधी पाऊल आहे आणि याचा अर्थ एक आहे, की विरोधकांनी आता सरळसरळ अराजकतावादी भूमिका स्वीकारली आहे. स्वतःच्या अपयशामुळे जागा गमावल्या आणि खापर मात्र आयोगावर आणि भाजपवर हे विरोधकांचे नेहमीचे तंत्र आहे आणि ते जनता स्वीकारण्याच्या मनस्थितीत नाही. पंतप्रधान मोदी यांना सत्तेवरून दूर करणे हा विरोधकांचा एकमेव अजेंडा आहे आणि या ना त्या प्रकारे ते शक्य नाही असं दिसताच त्यांनी हे रडीचे डाव खेळण्यास सुरुवात केली आहे. आपले आरोप सिद्ध करता येणे शक्य नाही हे कळून चुकल्यामुळे राहुल असोत किंवा राजद असो, त्यांच्यापुढे सध्या एकच मार्ग आहे, तो म्हणजे देशात अशांतता फैलावण्याचा पवित्रा स्वीकारणे. तोच मार्ग सध्या विरोधी पक्षांनी वापरला आहे. काँग्रेसने भाजपवर मतचोरीचा आरोप केला असतानाच सिद्धरामय्या यांच्या सरकारातील एक मंत्री राजण्णा यांनी मतचोरीचा आरोप अस्वीकारार्ह असल्याचा मुद्दा काढला तेव्हा राहुल यांनी त्यांना राजीनामा देण्यास सांगितले. राजण्णा यांनी राजीनामा दिला आहे. म्हणजे राहुल यांच्या या आरोपाची नौटंकी त्यांच्या पक्षातही सर्वांना मान्य नाही. त्यामुळे राहुल किती खोटे बोलतात हे सिद्ध झाले आहे. राहुल असो, की इंदिरा गांधी असोत, की काँग्रेसचा कुणीही नेता, त्याने राष्ट्रहिताला कायम दुय्यम लेखले आहे आणि त्याचीच शिक्षा ते आज भोगत आहेत. पण, अजूनही राहुल यांच्यासारखा बालबुद्धीचा नेता ज्याला काँग्रेसजन 'युवराज' म्हणतात. त्याला बुद्धी सुचत नाही. हेच खरे. वास्तविक राहुल यांचे मतचोरीचे आरोप आणि आरोप सिद्ध करण्याचे आव्हान दिले, की पळून जाणे याला जनताही कंटाळली आहे. महाराष्ट्रातही ईव्हीएम हॅक होतात, असा आरोप झाला होता आणि आयोगाने जेव्हा महाराष्ट्रातील सर्व पक्षांना हा आरोप सिद्ध करण्यासाठी बोलावले, तेव्हा अजित पवार यांच्यासह सारे लोक गैरहजर राहिले. फक्त आरोप करणे सोपे असते पण तो सिद्ध करणे अवघड असते हे त्याना माहीत आहे. राहुल यांनी तर कित्येकदा माफी मागितली आहे आणि खरे तर माफीवीर तेच आहेत! पण त्यांनी माफी मागितली, की काहीच बोलायचे नाही असे मौन पाळून बसण्याची सवय काँग्रेस आणि विरोधी पक्षांनी स्वतःला लावून घेतली आहे. राहुल यांची ताजी नौटंकी ही त्यांच्या याच मालिकेतील एक भाग आहे आणि यामुळेच ते सत्तेत येणार नाहीत. राहुल जितक्या लवकर हे ओळखतील तितके त्यांच्यासाठी चांगले.

# सिंहगड पुलाचे उद्घाटन रखडले; नागरिकांचा संताप उसळला

## मनसे करणार २५ तारखेला उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रोडवरील वाहतुकीची कोंडी आता दिवसेंदिवस भीषण होत चालली आहे. अनेक महिन्यांपासून एक लेन बंद असल्याने सकाळ-संध्याकाळ कामावर जाणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. पुलाचे काम पूर्ण झाले असूनही फक्त मंत्र्यांच्या उपस्थितीत भव्य उद्घाटन व्हावे, यासाठी हा पूल अजूनही बंद ठेवण्यात आल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला आहे.

नागरिकांचा सरळ सवाल असा आहे की, पुलाचे काम पूर्ण असून तो वाहतुकीसाठी तत्काळ सुरू करता येऊ शकतो, मग केवळ रिबन कापण्यासाठी लोकांना दररोज त्रास का दिला जात आहे? पुणे महानगरपालिका प्रशासनाने ही हयगय केली असून वाहतूक कोंडीने लोकांचे दैनंदिन जीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे.

खडकवासला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेतली आहे. परिसरात ठिकठिकाणी बॅनर लावून महापालिकेचा निषेध नोंदवला आहे. "२५ ऑगस्टपर्यंत पूल सुरु करा, अन्यथा सकाळी ११ वाजता मनसे स्वतःच 'मनसे स्टाईल' उद्घाटन करेल" असा इशारा देण्यात आला आहे.

पुणे शहर वाहतूक अध्यक्ष शिवाजीराव मते आणि खडकवासला अध्यक्ष विजय मते यांच्या नेतृत्वाखाली मनसेच्या शिष्टमंडळाने मनपा प्रशासनाविरोधात जोरदार आंदोलन केले.

या प्रकरणामुळे मनसे आणि महापालिका प्रशासन यांच्यात थेट संघर्ष उभा राहिला आहे.



नागरिकांमध्ये संतापाची लाट असून २५ ऑगस्ट रोजी मनसे प्रत्यक्षात उद्घाटन करते का, की त्याआधी महापालिका प्रशासन पूल सुरु करून हा वाद शमवते, याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत.

मतदारसंघातील सर्व पदाधिकारी सोनाली पोकळे , शिवाजीराव मते, बाळासाहेब मंडलिक, सुरेश देशमुख ,मुकुंद लायगुडे शंकर ढोणे आकाश साळुंखे, सिद्धार्थ पोकळे प्रशांत पवार ,नयन धोत्रे ,हर्षल रायकर ,शशिकांत वाघमारे अक्षय सनस सूर्यकांत कोरे ,सचिन कोरे बाळासाहेब हनमघर,मिलिंद गवळी जितेंद्र सपकाळे शिरीष कादे अंगराज पिसे राहुल वाळुंजकर स्वप्निल नांगरे इत्यादी उपस्थित होते.

## उच्च दर्जाचे संशोधन डिझाइनिंग आणि प्रकाशन यावर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विद्वत्तापूर्ण कारकिर्दीत वाढ करण्याची आणि तज्ज्ञ आणि विचारवंत म्हणून आपली प्रतिष्ठा वाढवण्याची आकांक्षा बाळगा. सर्व संस्था, व्यावसायिक समुदाय आणि उद्योग यांच्याकडून एक मूल्यवान व्यावसायिक व्हा. अनेकदा, खालील चिंता असू शकतात:

अभ्यासपूर्ण योगदानासाठी संशोधन विरुद्ध व्यवसायिक मूल्य किंवा दोन्हीचे मिश्रण.

शैक्षणिक सिद्धांत निर्मिती, मौल्यवान जर्नल्समध्ये प्रकाशन आणि उद्योगात आदरणीय अशा दृष्टीने मूल्य निर्माण करणाऱ्या संशोधनाच्या क्षेत्रांची ओळख पटवणे.

समकालीन आणि लोकप्रिय वादविवाद आणि निरीक्षणांच्या पलीकडे असलेले क्षेत्र ओळखणे.

टॉप रेटेड (FT-50, ABDC-A आणि ABS-4) जर्नल्सच्या प्रकाशन प्रक्रियेशी व्यवहार करणे. संशोधकांमध्ये मैत्री आणि सहकार्य विकसित करा. काही विषय आणि क्षेत्रे अत्यंत सैद्धांतिक असू शकतात आणि शैक्षणिक आणि विद्वत्तापूर्ण जर्नल्ससाठी चांगली असू शकतात, तर काही ऑपरेटिंग सिस्टम, प्रक्रिया आणि अंमलबजावणीयोग्य योजनेत अनुवादित करणे सोपे आहे.

वापरकर्ता उद्योग. दोन्ही मौल्यवान आहेत. सर्व संशोधनांना जर्नल्समध्ये प्रकाशित करण्यासाठी जागा मिळेल. शैक्षणिक व्यावसायिक स्वतःला संशोधक आणि व्यवसाय सल्लागार म्हणून वाढण्यासाठी आणि विकसित करण्यासाठी निर्देशित करू शकतात. विद्यापीठे आणि सल्लागार संस्थांच्या संशोधनातून मोठ्या प्रमाणात व्यवस्थापन पद्धती, प्रणाली आणि प्रक्रिया विकसित झाल्या आहेत. विद्यापीठातून आणि संस्थात्मक संशोधक अत्यंत प्रशंसित व्यवसाय सल्लागार बनले आहेत.




## संततधार पावसामुळे खेड तालुक्यात पिकांना जीवदान

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्यात गेल्या दोन दिवसापासून पावसाची संततधार सुरू आहे. पावसामुळे पिकांना जीवदान मिळाले असून शेतकरी समाधान व्यक्त करत आहे. मात्र आता पडणारा पाऊस जर असाच पुढे लांबला, तर पिकांना हानीकारक ठरू शकतो. तालुक्यातील शेतकरी या पावसामुळे सुखावला आहे. सोयाबीन पिकाचे क्षेत्र तालुक्यात मोठ्या प्रमाणात आहे. तसेच पश्चिम भागात भातपिक मोठ्या प्रमाणात होत आहे. या पिकाला पावसाची गरज होती. पाण्याअभावी पिके सुकत होती. काही शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकाला तुषार सिंचनने पाणी देऊन पिके वाचण्याचा प्रयत्न केला होता. आता पाऊस पडल्यामुळे पिकांना जीवदान मिळाले आहे. तसेच रब्बी हंगामातील ज्वारी पेरणीस महिन्याभरात सुरवात होणार आहे. पाऊस वाढत असल्यामुळे पुन्हा एकदा ओढे नाले खळखळून वाहू लागले आहे. पश्चिम भागातील जोरदार पावसाने चासकमान धरण शंभर टक्के भरले आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या पावसामुळे धरणामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी येत आहे. पुरनियंत्रण करण्यासाठी सांडव्यावरून भीमानदी पात्रामध्ये नऊ हजार दोनशे क्युसेक्सने विसर्ग करण्यात आला आहे.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बॉलीवूड फॅशन आयकॉन अनन्या पांडे एक खास, अद्वितीय फॅशन आणि ग्लो अप अनुभव "अनन्याज स्टाईल एडिट", फक्त एअरबीएनबीवर आयोजित करण्यासाठी सज्ज आहे. फॅशनप्रेमी, ग्लॅमरचा शोध घेणाऱ्या आणि अनन्याच्या चाहत्यांना त्यांच्या सिग्नेचर स्टाइल विश्वात प्रवेश देण्यासाठी डिझाइन केलेला हा अनुभव जास्तीत जास्त चार पाहुण्यांना उपलब्ध असेल. दिल्लीतील सर्वात आकर्षक एअरबीएनबीपैकी एक असलेल्या अनन्याच्या स्वप्नातील क्लोसेट आणि व्हॅनिटी स्पेसच्या स्वप्नातीतल आवृत्तीत राहण्याची संधी चाहत्यांना मिळेल. तिच्या वॉक-इन वॉर्डरोबपासून ते व्हॅनिटी झोनपर्यंत ही जागा पूर्णपणे धमाल फॅशन प्लेग्राउंडमध्ये रूपांतरित झाली आहे. अनन्यासोबत तिची एक्सपर्ट ए-टीम यात सहभागी होईल. ती चाहत्यांना फायनल ग्लो-अप देईल. त्यांना तिच्या आवडत्या स्टायलिस्टकडून स्टाईल करून घेण्याची संधी मिळेल. तिच्या विश्वासू सौंदर्य टीमकडून ग्लॅमरस लुक मिळेल आणि आवडत्या फोटोग्राफरकडून फोटो काढले जातील. उत्तम ग्लो-अप, भलीमोठी फॅशन ऊर्जा आणि आपणच हिरो असल्याची भावना तुम्हाला उत्साहित करेल. "मी एअरबीएनबी ओरिजिनल्सने तयार करून आयोजित केलेल्या "अनन्याज स्टाईल एडिट" द्वारे माझ्या ग्लिट्झ आणि ग्लॅमच्या जगात पाहुण्यांचे स्वागत करण्यास खूप उत्सुक आहे. फॅशन आणि अभिव्यक्ती हे एक अभिनेत्री म्हणून माझ्या व्यक्तिमत्त्वाचा एक मोठा भाग आहेत आणि माझ्या चाहत्यांना पर्सनल, प्रत्यक्ष पद्धतीने त्याची ओळख करून देणे ही खास गोष्ट आहे.



**'फॅशन अँड ग्लो अप' अनुभव, फक्त एअरबीएनबीवर**

## नवले ब्रिज व वडगाव ब्रिज हायवे परिसरातील खड्डे बुजवावेत

### सारंग नवले यांची मागणी

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रोडवरील नवले ब्रिज व वडगाव ब्रिज हायवे परिसरात मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. या खड्ड्यांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून अपघातांची शक्यता वाढली आहे. या खड्ड्यांची तात्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी भारतीय जनता युवा मोर्चा खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे माजी अध्यक्ष सारंग नवले यांनी केली आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे रस्त्यांची अवस्था अधिकच



बिकट झाली आहे. दुचाकी व चारचाकी वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असलेल्या या परिसरात खड्ड्यांमुळे चालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अपघात होऊन नागरिक गंभीर जखमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

विशेषत: सर्व्हिस रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना या खड्ड्यांचा मोठा त्रास होत आहे. अनेक वेळा वाहन घसरून नागरिक जखमी झाल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. मणके वा इतर अवयवांना इजा होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर सारंग नवले यांनी पुणे महानगरपालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याकडे विनंती केली आहे. तात्काळ कारवाई करून रस्त्यांवरील खड्डे बुजवावेत व नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे. यावेळी प्रशासनाकडून त्वरित कार्यवाहीचे आश्वासन देण्यात आले आहे.

# बाल हृदयरोग शस्त्रक्रिया सुविधांच्या उपलब्धतेमुळे रूग्ण व कुटुंबांना नवी आशा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बालहृदयरोग शस्त्रक्रिया सुविधांच्या उपलब्धतेमुळे पुणेलगत असलेल्या रूग्ण व कुटुंबांना नवी आशा निर्माण झाली आहे. विश्वराज हॉस्पिटल, लोणी येथे परवडणाऱ्या दरात असलेला हा उपक्रम माईर्स एमआयटीच्या विश्वस्त व सहसचिव तसेच विश्वराज हॉस्पिटल लोणीच्या कार्यकारी संचालिका डॉ.आदिती कराड यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आला आहे. डॉ.आदिती कराड यांच्या वाढदिवसानिमित्त व विश्वराज हॉस्पिटल ने 50 बाल हृदयरोग शस्त्रक्रियांचा टप्पा पार केल्याच्या निमित्ताने एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जन्मजात हृदयरोग असलेल्या बालकांच्या कुटुंबियांना यामुळे नवी आशा निर्माण झाली आहे.

याप्रसंगी वैद्यकीय संचालक डॉ.सुजित कुमार, सहायक वैद्यकीय अधीक्षक डॉ सचिन कातकडे, बालहृदयरोग तज्ञ डॉ.आशिष बनपुरकर, बालरोग तज्ञ व नवजात शिशु विभागाचे प्रमुख डॉ.चंद्रकांत सहारे, बालरोग तज्ञ डॉ.अनिल गोस्वामी,कामकाज प्रमुख श्री राजेश पनवर, मार्केटिंग प्रमुख श्री लोकेश रघुवंशी, मार्केटिंग विभागचे सहाय्यक व्यवस्थापक श्री किरण कुलकर्णी , मेडिकल सहाय्यक सीताराम धस आणि शिबिर समन्वयक सुरेश शितोळे आदी मान्यवर उपस्थित होते.




विश्वराज हॉस्पिटल, लोणी येथील बालहृदयरोग तज्ञ डॉ.आशिष बनपुरकर म्हणाले की, आम्ही नियमितपणे बारामती,सासवड,लोणंद,फलटण, इंदापूर व पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात मोफत तपासणी शिबिरे आयोजित करत असतो.यामध्ये वैद्यकीय तपासणी,मुल्यांकन,रूग्णांचे आधीचे असलेले मेडिकल रिपोर्टस याची तपासणी करतो.जर एखाद्या बालकाला पुढील तपासणीची गरज असेल तर त्यांना आमच्या रूग्णालयात घेऊन येतो.हृदयरोग प्रक्रियांमध्ये आट्रियल सेप्टल डिफेक्ट (एएसडी) डिव्हाईस क्लोजर,व्हेंट्रिक्युलर सेप्टल डिफेक्ट (व्हीएसडी) अशा सामान्यत: केल्या जाणाऱ्या प्रक्रियांपासून ते डक्टल स्टेंटिंग आणि ट्रान्सकॅथेट्रल फाँटन कम्प्लिशन यासारख्या आधुनिक प्रक्रियांचा समावेश आहे.लहान मुलांमधील हृदयात असलेले जन्मजात रचनात्मक दोष यावर लवकरात लवकर उपचार करणे गरजेचे असते.असे केल्यास त्यांना सामान्य आयुष्य जगता येते.

ते पुढे म्हणाले की,आधुनिक कॅथलॅब , बाल हृदयरोग प्रक्रियांसाठी समर्पित शल्यचिकित्सक कक्ष,त्याचबरोबर नवजात शिशु अतिदक्षता विभाग (पीआयसीयू) आणि बालरोग अतिदक्षता विभाग (एनआयसीयूचे) भक्कम पाठबळाच्या आधारे या जीवनदायी प्रक्रिया केल्या जातात. डॉक्टर,परिचारिका,सहाय्यक कर्मचारी आणि वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते यांच्या सांघिक प्रयत्नांमुळे हा टप्पा पार करता आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.गौरी बारवकर व डॉ.कविता शेळके यांनी केले.

# थोडक्यात



## भारतीय नौदल व जागृतीची भागीदारी

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : भारतीय नौदलाने जागृती रिहॅबिलिटेशन सेंटर प्रा. लि. (JRC) यांच्यासोबत नौ सेना भवन येथे सामंजस्य करार (MoU) केला. या करारान्वये नौदलातील विद्यमान व निवृत्त कर्मचाऱ्यांच्या बौद्धिक व विकासात्मक अक्षमत्व (PwIDDs) असलेल्या आश्रितांच्या आजीवन काळजी व पुनर्वसनाची सुविधा उपलब्ध होणार आहे. देशभरात १८ पेक्षा जास्त केंद्रे चालवणारे JRC, नौदल कुटुंबीयांना प्राधान्याने प्रवेश देणार असून उपचार पॅकेजेसवर २० टक्के सवलत (औषधे व लॅब तपासण्या वगळता) दिली जाणार आहे. निवासी सुविधा, उपचारात्मक मदत, पुनर्वसन कार्यक्रम आणि वैयक्तिक उपचार योजना या सेवांचा यात समावेश आहे. मानसिक आरोग्य, व्यसनमुक्ती, डिमेन्शिया व वयोवृद्ध काळजी क्षेत्रांत कार्यरत JRC कडे देशभरातील ५०० हून अधिक तज्ज्ञांचा कार्यसंघ असून हजारो रुग्णांना सातत्यपूर्ण सेवा पुरवली जाते. याप्रसंगी JRC चे संचालक डॉ. अमर शिंदे म्हणाले, "राष्ट्रसेवेतील वीरांच्या कुटुंबियांना मदत करण्याचा आम्हाला मान मिळतोय. या सहकार्याद्वारे संवेदनशील आणि शास्त्राधिष्ठित काळजी देऊ." कार्यक्रमाला कमोडोर विजय कुमार झा, कमांडर वीरसिंग खारियाल, सर्जन कमांडर शिल्पा बाजपाई यांसह NWWA प्रतिनिधी उपस्थित होते. कमोडोर झा म्हणाले, "या करारामुळे आमच्या विशेष गरजा असलेल्या आश्रितांना उच्च दर्जाची व दीर्घकालीन सेवा मिळणार असून कल्याणासाठी आमची बांधिलकी अधिक दृढ होईल." हा करार नौदलाच्या कर्मचाऱ्यांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षितता व सर्वांगीण कल्याणासाठीच्या वचनबद्धतेचे प्रतिक ठरत आहे.


## वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : राजगुरूनगर येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने शनिवार (दि. २३ ऑगस्ट) रोजी हुतात्मा शिवराम हरी राजगुरू राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेव टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी दिली. महाविद्यालयात दरवर्षी २४ ऑगस्ट हा हुतात्मा राजगुरू यांचा जन्मदिवस प्रेरणा दिन म्हणून साजरा होतो. त्यांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून या स्पर्धेचे आयोजन केले जाते. स्पर्धेच्या निमित्ताने महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वक्तृत्व शैलीचा आविष्कार दाखवण्याची संधी मिळते. स्पर्धेचे हे ३४ वे वर्ष असून, वरिष्ठ व कनिष्ठ गटात स्वतंत्रपणे स्पर्धा होत आहे. वरिष्ठ गटातील स्पर्धेचे विषय उद्योगरत्न : रतन टाटा, आहे एआय तरीही..., वाचताना वेचलेले, निसर्गाने द्यावे, मानवाने घ्यावे असे आहेत. तर कनिष्ठ गटातील स्पर्धेचे विषय असा घडवूया महाराष्ट्र, अक्षर कवयित्री : बहिणाबाई चौधरी, मला भावलेले राजकीय व्यक्तिमत्त्व, ऑनलाइन शिक्षण : अपेक्षा आणि वास्तव हे आहेत. स्पर्धेसाठी दोन्ही गटांत वैयक्तिक, उत्तेजनार्थ आणि सांघिक अशी विविध बक्षिसे आहेत. त्यात रोख रक्कम, प्रशस्तिपत्र आणि हुतात्मा राजगुरू चषक व साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहेत. ही स्पर्धा राज्यस्तरीय असल्याने महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयांनी आपला दोन्ही गटांसाठी प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचा संघ पाठवण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, स्पर्धा संयोजन समिती प्रमुख डॉ. दिलीप मुळूक, प्रा.धनंजय बोऱ्हाडे यांनी केले आहे.

## नवरीसह दोन महिलांना अटक

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : मराठवाड्यातील खरी ओळख लपवून खोटे लग्न करणाऱ्या टोळीतील नवरीसह दोन महिला आरोपींना खेड पोलिसांनी बेड्या ठोकल्या. नवरदेव व त्यांच्या कुटुंबीयांना लुटणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करुन गरजवंताना गंडा घालणाऱ्या नवरीसह तीन महिला आरोपींना अटक झाली तरीही या टोळीतील एक संशयीत महिला फरारी आहे. सुवर्णा उत्तम गव्हाणे ( वय २८ रा. सारोळा, ता. औसा जि.लातुर), अनुसया राजेंद्र मोरे उर्फ सारिका नंदकुमार भोईने (वय ५०, रा.खडकगाव, ता. जि. लातुर ), मनिषा बाळु कदम उर्फ रेखा मिलिंद सुर्यवंशी (वय ४५, रा. गणेश मंदिराजवळ कोल्हेनगर, ता.जि. लातुर ), ज्योती संतोष तांबोळी (वय ४०, रा.वडगाव सहाणी, ता. जुन्नर ) अशी आरोपींची नावे आहेत. याबाबत खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपींनी संगनमत करुन दि.२५/०४/२०२५ रोजी जैदवाडी (ता.खेड ) येथील लग्नासाठी इच्छुक असणारा एक युवक व त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधुन यातील आरोपी ज्योती तांबोळी हीने मी तुमच्या मुलाचे चांगल्या मुलीसोबत लग्न लावून देते असे सांगुन त्यांचेकडून एक लाख साठ हजार रुपये घेतले.

## थोडक्यात



### भीम पेमेंट्स ॲप इनोव्हेशन आणि साधेपणाचा संगम

पुणे(आरंभ पर्व) : एनपीसीआय भीम सर्व्हिसेस लिमिटेडने (NBSL) विकसित केलेले भीम पेमेंट्स ॲप इनोव्हेशन आणि साधेपणाचा संगम साधत भारतातील डिजिटल पेमेंट्सची नवी व्याख्या घडवत आहे. या ॲपमध्ये मराठीसह 15 पेक्षा अधिक भारतीय भाषांची सुविधा आहे, ज्यामुळे शहरी, ग्रामीण आणि अर्थशहरी वापरकर्त्यांसाठी डिजिटल पेमेंट्स सहज उपलब्ध झाले आहेत. कमी नेटवर्क कनेक्टिव्हिटीमध्येही हे ॲप सुरळीत व्यवहार करण्यास सक्षम आहे. सर्व वयोगटातील वापरकर्त्यांना लक्षात घेऊन डिझाईन केलेल्या या ॲपमध्ये जाहिरात इंटरफेस उपलब्ध आहे. व सुलभ भीम ॲपचा वापर आणि पोहोच सातत्याने वाढत असून, वाढत्या ग्राहकविश्वासाचे प्रतीक मानले जात आहे. जून 2025 मध्ये या ॲपमार्फत 79.58 दमालक्ष व्यवहार झाले. ज्यांची एकूण किंमत ₹12.110 कोटी होती. हे आकडे जून 2024 च्या तुलनेत प्रमाणात सुमारे 212% आणि मूल्यात 46% वाढ दर्शवतात. याशिवाय, भीम ॲपमध्ये अपानामनी मॅनेजमेंट टूल्स उपलब्ध आहेत ज्यांच्या मदतीने वापरकर्ते खर्च ट्रॅक, व्यवस्थापित व विभाजित करू शकतात त्यामुळे आर्थिक व्यवहार अधिक संघटित व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडणे शक्य होते.

### स्पेनचे महाराष्ट्र मंडळ, युगांडाचे बेंजामिन तुमवेसीगये ठरले विजेते

पुणे(आरंभ पर्व) : पुण्याच्या गौरवशाली गणेशोत्सवाला जागतिक स्तरावर मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी गेल्या वर्षीपासून ग्लोबल गणेश फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात येत आहे. या फेस्टिव्हलमध्ये झालेल्या ग्लोबल गणेश करंडक २०२५ या जागतिक स्पर्धेत स्पेनच्या बार्सिलोना येथील महाराष्ट्र मंडळ (उत्सव विभाग) व युगांडाच्या बेंजामिन तुमवेसीगये (फोटोग्राफी विभाग) हे विजेते ठरले. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ गणेशोत्सव झाल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते घेण्यात येणार आहे. उत्सव विभागात जपान येथील योकोहामा मंडळाने द्वितीय, झाम्बिया येथील महाराष्ट्र मंडळ लुसाकाने तृतीय, तर नायजेरियाच्या महाराष्ट्र मंडळ रेसिडेन्स असोसिएशनने उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले. फोटोग्राफी विभागात जर्मनीतील कार्तिक संघानी यांनी द्वितीय, तर भारतातील पुणेकर असलेल्या आनंद चैनी यांनी तृतीय क्रमांक मिळवला. स्पर्धेसाठी ऋशिकेष कायत, ऋतुजा नराल, तेजस्विनी गांधी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले होते. स्पर्धेच्या संयोजनात ग्लोबल गणेश फेस्टिव्हलचे कार्यकारी अध्यक्ष वैभव वाघ, स्वागत समिती प्रमुख अमोल जोशी, आंतरराष्ट्रीय समन्वयक धनश्री पाटील, मुख्य समन्वयक अनिरुध्द येवले, डॉ. सतिश देसाई, प्रणव भुरे, चिन्मय वाघ यांनी पुढाकार घेतल्याचे प्रसिद्धीप्रमुख जीवराज चोले यांनी कळवले आहे.

### आयएसबीअँडएम पुणे येथे आंतरराष्ट्रीय एफडीपीचे आयोजन




पुणे(आरंभ पर्व) : इंटरनॅशनल स्कूल ऑफ बिझनेस अँड मीडिया (ISB&M), पुणे येथे "उत्कृष्ट दर्जाचे संशोधन डिझाईनिंग व पब्लिशिंग" या विषयावर आंतरराष्ट्रीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम (FDP) 2025 पार पडला. संस्थापक-अध्यक्ष डॉ. प्रमोद कुमार व डॉ. अरुण जोशी यांच्या सहकार्याने आयोजित या चार दिवसीय हायब्रीड कार्यक्रमात ६५ हून अधिक संशोधक सहभागी झाले. या कार्यक्रमात डॉ. मीना बेईगी (साउथॅम्प्टन बिझनेस स्कूल, यूके), डॉ. रमाधार सिंह, डॉ. प्रवीण कुमार (बार्कलेज इंडिया) यांच्यासह आंतरराष्ट्रीय प्राध्यापकांनी संशोधन पद्धतीशास्त्र, डेटा ॲनॅलिटिक्स, Smart PLS, SPSS, बिब्लियोमेट्रिक्स व मेटा-ॲनॅलिसिस यावर मार्गदर्शन केले. डॉ. अरुण जोशी यांनी सांगितले की एफडीपीचा उद्देश "जिज्ञासा-केंद्री संशोधन संस्कृती विकसित करणे" हा आहे.







# भाजपाचे युवानेते सारंग नवले यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

## भारतीय जनता पार्टीचे युवा नेते व उद्योजक सारंग नवले यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

भारतीय जनता पार्टीचे युवा नेते व युवा उद्योजक सारंग नवले यांचा वाढदिवस अत्यंत साध्या पण उत्साही वातावरणात नवले आयटी पार्क येथे साजरा करण्यात आला.

या प्रसंगी सामाजिक, राजकीय, व्यावसायिक अशा सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

खडकवासला मतदारसंघासह पुणे शहरातील विविध मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांतदादा पाटील, राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ, आमदार भीमराव तापकीर, शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

सारंग नवले हे माजी नगरसेवक बाळासाहेब आप्पा नवले यांचे चिरंजीव असल्याने त्यांचा राजकीय क्षेत्रात चांगला लौकिक आहे. त्यांनी भारतीय जनता युवा मोर्चा खडकवासला पूर्व अध्यक्षपद भूषविले आहे. धायरी वडगाव परिसरातील विविध प्रश्न सातत्याने मांडून त्यांनी जनतेच्या प्रश्नांना नेहमीच आवाज दिला आहे. यावरून त्यांच्याविषयी जनतेच्या मनात असलेले प्रेम दिसून येत आले. स्वत:च्या मनोगतात सारंग नवले यांनी आगामी काळातही कार्यरत राहून जनतेच्या सेवेसाठी तत्पर राहण्याचा संकल्प व्यक्त केला.

मान्यवरांनी दिलेल्या शुभेच्छांचा त्यांनी स्वीकार करत सर्वांचे आभार मानले. यावेळी अनेक सर्वपक्षीय मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते. अत्यंत उत्साहात हा वाढदिवस साजरा करण्यात आला.

## विकास गर्ग यांची श्री अग्रसेन ट्रस्ट चिंचवड प्राधिकरणच्या अध्यक्षपदी निवड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

श्री अग्रसेन ट्रस्ट चिंचवड प्राधिकरणच्या अध्यक्षपदी विकास टी. गर्ग यांची निवड करण्यात आली आहे. यासोबतच ३१ मार्च २०२८ पर्यंत कार्यभार पाहणारी नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. १८ ऑगस्ट रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत पंच कमिटीचे सदस्य कृष्णकुमार गोयल, वेदप्रकाश गुप्ता व रामअवतार अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. पंच कमिटीच्या वतीने कृष्णकुमार गोयल यांनी अध्यक्षस्थान भूषविले होते. त्यांना मावलते अध्यक्ष सुनील अग्रवाल व सतपाल मित्तल यांचा सहकार्य लाभला.



नवीन कार्यकारिणीत अशोक आर. अग्रवाल, प्रवीण एन. अग्रवाल, आशीष प्रेम गर्ग, रमेश कश्मीरीलाल अग्रवाल, मोहन गर्ग, जगमोहन अग्रवाल, विकास टी. गर्ग, राजेश मामनचंद अग्रवाल, धर्मेंद्र अग्रवाल, महावीर मनोहरलाल बंसल, दिनेश रामगोपाल अग्रवाल, विनोद बालकिशन मित्तल, नरेश हुकुमचंद गुप्ता, पवन अग्रवाल व लाजपत मित्तल यांचा समावेश आहे.

## १०८ शाळा शुद्ध पिण्याच्या पाणी प्रणालीसह सुसज्ज

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ह्युंडाई मोटर इंडिया फाऊंडेशन (एचएमआयएफ) या ह्युंडाई मोटर इंडिया लिमिटेड (एचएमआयएल)च्या सीएसआर शाखेने पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील 108 सरकारी शाळांमधील मुलांना शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करून दिली. एकूण 2.10 कोटी रूपयांच्या गुंतवणूकीसह $H_2OPE$ या उपक्रमाद्वारे उत्तम सामुदायिक स्वास्थ्य, विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे संरक्षण आणि शिक्षण हक्क कायदा (आरटीई), 2009 च्या कलम 19 द्वारे निर्देशित शाश्वत विकास ध्येयांमध्ये योगदान देण्याप्रती एचएमआयएफची कटिबद्धता दिसून येते. आरटीई 2009 च्या कलम 19 अंतर्गत शाळांमध्ये शुद्ध पिण्याचे




पाणी उपलब्ध करून देणे अनिवार्य आहे. पुण्यातील विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये अधिकृत हस्तांतरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाराष्ट्राचे माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार, पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुण्याचे जिल्हाधिकारी श्री. जितेंद्र डुडी, जिल्हा परिषद, पुणेचे सीईओ श्री. गजानन पाटील, पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री संदीप सिंग गिल, ह्युंडाई मोटर इंडिया लिमिटेडचे फंक्शन हेड श्री. श्यामकुमार सिंह यांच्यासह जिल्हा परिषद शाळांमधील प्रतिनिधी आणि ह्युंडाई मोटर इंडिया लिमिटेडचे इतर अधिकारी उपस्थित होते. या प्रकल्पाअंतर्गत केलेल्या योगदानामुळे निवडक शाळा आणि आसपासच्या समुदायांमध्ये परिवर्तनात्मक बदल घडून आले आहेत. विद्यार्थी, शिक्षक, शालेय कर्मचारी आणि समुदायातील सदस्यांसह जवळपास 13,000 प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभार्थींच्या जीवनात सकारात्मक परिणाम घडून आला आहे. प्रकल्पाच्या सर्वांगीण दृष्टिकोनामुळे शालेय स्तरावर पिण्याच्या पाण्याच्या पायाभूत सुविधांमध्ये त्वरित आणि दीर्घकालीन सुधारणा झाल्या आहेत. या प्रयत्नांमुळे सकारात्मक परिणाम दिसून आले, जसे विद्यार्थ्यांच्या आरोग्यामध्ये सुधारणा, शाळेमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढणे, तसेच स्वच्छता पद्धतींचा मोठ्या प्रमाणात अवलंब आणि अधिक सर्वसमावेशक व सहाय्यक अध्ययन वातावरण निर्माण झाले आहे.

# विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'मेडिएशन' प्रशिक्षण उपलब्ध होणार

## प्रा. संजय बी. चोरडिया यांचे मत; सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचा लंडनच्या रॅडंक्स लिमिटेडसोबत सामंजस्य करार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स पुणे आणि लंडन (युके) येथील रॅडंक्स लिमिटेड यांच्यात शैक्षणिक व बौद्धिक देवाणघेवाण वाढवण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया आणि रॅडंक्स लिमिटेडच्या संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रेनू राज यांनी नुकत्याच या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. प्रसंगी 'सूर्यदत्त'च्या उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, अधिष्ठाता प्रा. डॉ. प्रतीक्षा वाबळे, विधी महाविद्यालयाच्या समन्वयक प्रा. केतकी बापट आदी उपस्थित होते.



प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "या करारामुळे मध्यस्थी (मेडिएशन) आणि पर्यायी वाद निराकरण या क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय सहकार्याला नवे व्यासपीठ मिळाले आहे. या अंतर्गत रॅडंक्सचा ८० तासांचा 'मेडिएशन फाउंडेशन ट्रेनिंग कोर्स' संयुक्त स्वरूपात 'सूर्यदत्त'च्या विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे. यामुळे भविष्यातील मध्यस्थ, कायदेविषयक तज्ज्ञ व शांतिदूत घडवण्यास मदत होणार आहे. तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षण, जागतिक प्रमाणपत्र व व्यावसायिक संधी उपलब्ध होणार असून, भारतीय युवकांना जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त मध्यस्थ आणि 'पीस लीडर्स' म्हणून घडवण्याच्या दिशेने हा करार महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे."

रॅडंक्स लिमिटेड ही आंतरराष्ट्रीय स्तरावर सीमापार मध्यस्थी व वाद निराकरण क्षेत्रातील अग्रगण्य संस्था आहे. सुसंघटित, नैतिक आणि परिणामकारक प्रशिक्षण पद्धतीसाठी ओळखली जाणारी ही संस्था जागतिक दर्जाचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रसिद्ध आहे.

डॉ. रेनू राज या आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त मध्यस्थ असून एसआरए-नोंदणीकृत परदेशी वकील आणि भारतीय संसदेत २०२३ मधील 'मेडिएशन बिल अमेंडमेंट' समितीच्या सदस्या आहेत. त्यांनी मध्यस्थीला जीवन बदलणारे साधन म्हणून प्रोत्साहन देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन 'सूर्यदत्त'तर्फे २०२० मध्ये त्यांना 'सूर्यदत्त नॅशनल अवॉर्ड' देऊन सन्मानित करण्यात आले होते.

सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स हे बहुविषयक एकात्मिक कॅम्पस असून, शालेय शिक्षणापासून कनिष्ठ महाविद्यालय, डिप्लोमा, पदवी, पदव्युत्तर आणि डॉक्टरेट संशोधनापर्यंत विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

व्यवसाय व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञान, वाणिज्य, पर्यटन व आतिथ्य व्यवस्थापन, संगणक अनुप्रयोग, इंटिरिअर डिझाइन, फॅशन डिझाइन, इव्हेंट मॅनेजमेंट, मास कम्युनिकेशन, शिक्षण, ॲनिमेशन, कायदा, सायबर सिक्युरिटी, फिजिओथेरपी, फार्मसी, नर्सिंग, फिल्ममेकिंग, ब्युटी अँड वेलनेस, हेल्थ अँड फिटनेस तसेच परफॉर्मिंग आर्ट्स अशा विविध शाखांमध्ये शिक्षण दिले जाते.

"मूल्यवर्धित अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून वैविध्यपूर्ण क्षेत्रातील नवीन आणि उदयोन्मुख क्षेत्रातील प्रशिक्षणाचा 'सूर्यदत्त'ने समावेश केला आहे. सध्या जगभर तंटा निवारणात मध्यस्थी हा अतिशय महत्वाचा घटक बनला आहे. त्यामुळे 'सूर्यदत्त'मध्येही लवकरच मध्यस्थी या विषयात उद्योगाभिमुख, व्यावहारिक आधारित मूल्यवर्धित अभ्यासक्रम सुरु करत आहोत. सेमिनारमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व प्राध्यापकांनी आणि विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा आणि न्याय वितरण प्रणालीचा एक भाग व्हावे असे आवाहन प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी केले.

# जगप्रसिध्द कवी अर्न्स्ट यांडल यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त पुण्यात विशेष प्रदर्शनाचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ग्योथं- इन्स्टिट्युट मॅक्स म्युलर भवन पुणे ने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जर्मन विभागाच्या सहयोगाने जगप्रसिध्द कवी अर्न्स्ट यांडल यांच्या 100 व्या जयंती वर्षानिमित्त त्यांचे जीवन आणि यशस्वी कारकीर्द साजरी करण्यासाठी एका विशेष प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. हे प्रदर्शन 22 ऑगस्ट 2025 पर्यंत सकाळी 10 ते संध्याकाळी 7 दरम्यान कर्वे रोड,एरंडवणे येथील पांडुरंग कॉलनी येथील द बॉक्स स्टुडिओ येथे सुरू असणार आहे. ऑस्ट्रिया येथील लिटरेचर अर्काईव्ह व्हिएन्नाचे संचालक डॉ.बर्नहार्ड फेट्झ यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.



अर्न्स्ट यांडल हे ऑस्ट्रियन लेखक होते व जर्मन भाषिक जगातील काव्य चळवळीतील आघाडीचे नाव आहे.त्यांच्या प्रायोगिक कवितांसाठी ते ओळखले जायचे. त्यांच्या कविता लिहिण्याची शैली अशी होती की,भाषा हाच उद्देश व काव्याचा विषय होता,दृश्य काव्य ज्यामध्ये आशयाचे प्रतिनिधित्व करणारे दृश्य हे केंद्रस्थानी होते,ध्वनी स्वरूपातील कविता ज्या केवळ आपण बोलल्यानंतरच उलगडतात. त्यांच्या काव्यामध्ये अशी जादू आणि विविधता आहे. पुण्यातील लोकांसाठी हे प्रदर्शन बहुसंवेदी स्वरूपात (मल्टीसेंसरी फॉरमॅट) आणि जर्मन व्यतिरिक्त इंग्रजी व मराठीत प्रदर्शित करण्यात आले आहे.

ग्योथं- इन्स्टिट्युट मॅक्स म्युलर भवनच्या भाषा विभागाच्या प्रमुख आणि उपसंचालिका आलिसिया पाद्रोस म्हणाल्या की, हे प्रदर्शन यांडल यांच्या ध्वनी,रचना आणि जागेचा अभूतपूर्व वापर हा त्रिमितीय इन्स्टॉलेशन्स, साऊंडस्केप्स,व्हिज्युअल प्रोजेक्शन्स अशा मनोरंजक मिश्रणाद्वारे लोकांसमोर आणले जाईल. जर्मन भाषेला परदेशी भाषा म्हणून प्रोत्साहन देण्यासाठी आणि जर्मन भाषिक देशांच्या संस्कृतीला नाविन्यपूर्ण आणि आकर्षक मार्गांनी लोकांसमोर आणण्याच्या ग्योथं- इन्स्टिट्युट प्रयत्नांचा एक भाग आहे.

नागरिकांना अर्न्स्ट यांडल यांची कल्पकता,सर्जनशीलता पाहण्याची,ऐकण्याची आणि अनुभवण्याची ही एक संधी आहे. त्यांच्या कविता या पारंपरिक वाचनाला आव्हान देतात आणि प्रेक्षकांना भाषेचा स्तरीत,बहुसंवेदी अनुभव प्रदान करतात.



# थोडक्यात



• माजी नगरसेवक हरिदास चरवड यांचा आंदोलनाचा इशारा

## गणेशोत्सवापूर्वी खड्डेमुक्त रस्त्यांची मागणी

वडगाव (आरंभ पर्व) : सिंहगड रोडवरील वडगाव बुद्रुक, माणिकबाग, वडगाव खुर्द आणि धायरी परिसरातील मुख्य रस्त्यांवरील खड्ड्यांचा प्रश्न गंभीर झाला आहे. आगामी गणेशोत्सव २०२५ पूर्वी हे खड्डे तातडीने बुजवावेत अशी मागणी माजी नगरसेवक हरिदास चरवड यांनी निवेदनाद्वारे केली. २३ जून व ४ जुलै रोजी यासंदर्भात मनपाला निवेदन दिले होते. मात्र फक्त तात्पुरती मलमपट्टी करून डागडुजी करण्यात आल्याने एका पावसातच रस्ते पुन्हा खड्डेमय झाले. गगनगिरी बिल्डिंग ते म्हशीचे गोठे सर्व्हिस रोड, अटल बिहारी वाजपेयी शाळेजवळील रस्ता, पाऊजाई मंदिर परिसर, सिंहगड कॉलेज मार्ग, गोसावी वस्ती, धायरी फाटा व माणिकबाग येथील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. आमदार भिमराव तापकीर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतही या प्रश्नावर तातडीने कार्यवाहीचे आदेश देण्यात आले होते. तरीही उपाययोजना न झाल्यास गणेशोत्सवा पूर्वी नागरिक रस्त्यावर उतरून आंदोलन करतील, असा इशारा माजी नगरसेवक चरवड यांनी दिला.



## नागरिक बेपत्ता

पुणे (आरंभ पर्व) : मांजरी बु. परिसरात राहणारे 76 वर्षीय ज्ञानदेव गणपत खरात हे मागील तीन दिवसांपासून बेपत्ता झाले आहेत. या संदर्भात त्यांच्या मुलाने हडपसर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार राहुल खरात यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांचे वडील ज्ञानदेव गणपत खरात (वय 76 वर्षे, मांजरी बु., पुणे) हे दिनांक 16 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 11.30 वाजता राहत्या घरातून बाहेर पडले. ते त्यांच्या नातवंडांना शाळेतून आणण्यासाठी हिरो मॅस्ट्रो डिलक्स (एमएच 42 एसी 1809) दुचाकीवरून गेले होते. मात्र कोणालाही काही न सांगता ते कोठेतरी निघून गेले व त्यानंतर घरी परतले नाहीत. नातेवाईक व परिसरात चौकशी करूनही त्यांचा ठावठिकाणा लागला नसल्याने अखेर मुलगा राहुल खरात यांनी पोलिसांकडे धाव घेतली. हडपसर पोलिसांनी मनुष्य बेपत्ता नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे. तरी सदर व्यक्ती कोठेही कोणालाही आढळून आल्यास कृपया सदर 9890133575 भ्रमणध्वनीवर किंवा जवळच्या पोलिस स्टेशनमध्ये संपर्क करावा.

## देखभालीसाठी २७ व २८ ऑगस्ट रोजी 'शिवसृष्टी' बंद

पुणे (आरंभ पर्व) : पुणेकरांचे आकर्षण ठरलेल्या आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचे दर्शन घडवणाऱ्या 'शिवसृष्टी'मध्ये येत्या २७ व २८ ऑगस्ट रोजी प्रेक्षकांना प्रवेश मिळणार नाही. नियोजित देखभालीच्या कामांमुळे शिवसृष्टी दोन दिवस बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती शिवसृष्टीचे प्रशासकीय अधिकारी अनिल पवार यांनी दिली. महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने आंबेगाव बुद्रुक येथे उभारण्यात आलेली शिवसृष्टी पर्यटकांसाठी मोठे आकर्षण ठरत आहे. या प्रकल्पात वेळोवेळी देखभाल आणि दुरुस्तीची कामे करण्यात येतात. याच पार्श्वभूमीवर प्रतिष्ठानने २७ व २८ ऑगस्ट रोजी शिवसृष्टी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. "नियमित देखभालीमुळे पर्यटकांचा अनुभव अधिक उत्तम होतो. आवश्यक कामे पूर्ण झाल्यानंतर २९ ऑगस्टपासून शिवसृष्टी पूर्ववत सुरु होईल," असेही पवार यांनी स्पष्ट केले. दरम्यान, सुटीच्या दिवसांत मोठ्या संख्येने पर्यटक येथे भेट देतात. त्यामुळे २७ व २८ ऑगस्ट रोजी बंद राहणार असल्याची नोंद नागरिकांनी घ्यावी, असे आवाहन प्रतिष्ठानकडून करण्यात आले आहे.

## सिंहगड रोडवर भव्य नेत्र रुग्णालय

पुणे (आरंभ पर्व) : सिंहगड रोड परिसरात आरोग्यसेवेच्या सुविधेत भर घालत अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या डॉ. दूधभाते नेत्रालय व रेटीना सेंटरचे उद्घाटन येत्या रविवारी, २४ ऑगस्ट २०२५ रोजी होणार आहे. माणिकबाग पेट्रोल पंपाशेजारील गल्लीमध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या या नेत्ररुग्णालयाचा भव्य सोहळा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शुभहस्ते पार पडणार आहे. या प्रसंगी महिला आयोग अध्यक्षा रुपालीताई चाकणकर, विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर, राष्ट्रवादीचे माजी नेते काका चव्हाण, चेतनजी तुपे तसेच वडगाव शेरीचे आमदार बापूसाहेब पाठारे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. प्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ. अनिल दूधभाते यांच्या मार्गदर्शनाखाली हे केंद्र उभारण्यात आले असून डोळ्याच्या विविध विकारांचे निदान व उपचार एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याची सुविधा येथे आहे. पुणे शहरासह ग्रामीण भागातूनही मोठ्या प्रमाणावर रुग्ण उपचारासाठी येथे दाखल होतात.

# उड्डाणपूल सुरू करण्यासाठी शिवसेनेचे "ॐ फट स्वाहा आंदोलन"

## मुख्यमंत्री, पालकमंत्री, नगरविकास मंत्री प्रकट व्हा – आगळेवेगळे आंदोलन

पुणे (दै. आरंभ पर्व)

सिंहगड रोडवरील विठ्ठलवाडी ते माणिकबाग हा उड्डाणपूल पूर्ण होऊनसुद्धा फक्त सत्ताधारी नेत्यांच्या उद्घाटनासाठी वेळ न मिळाल्याने जनतेला वाहतूककोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांच्या या ज्वलंत प्रश्नाकडे सरकारचे दुर्लक्ष होत असल्याने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, पुणे शहराच्या वतीने आज आगळेवेगळे आंदोलन करण्यात आले.



सिंहगड रोडवरील नवीन उड्डाणपुलावर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री अजित पवार आणि नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रतिमेसमोर "ॐ फट स्वाहा" म्हणत होम-हवन करून पूल जनतेसाठी सुरू करण्याची मागणी करण्यात आली. या आंदोलनादरम्यान "सिंहगड रोडवासीयांना ट्रॅफिक जॅममध्ये अडकवणाऱ्या सरकारचा निषेध होवो" अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या.

यावेळी बोलताना शहरप्रमुख संजय मोरे म्हणाले, "पुलाचे काम जनतेच्या कररूपी पैशातून पूर्ण झाले असूनही केवळ सत्ताधाऱ्यांच्या उद्घाटन सोहळ्याच्या हव्यासापोटी नागरिकांची गैरसोय केली जात आहे. आज पुण्यातच असले तरी मुख्यमंत्री फडणवीस उड्डाणपुलाचे उद्घाटन करायला आले नाहीत.

कारण फक्त दोन दिवसांच्या पावसात या नव्या पुलावर खड्डे पडले आहेत. पुढील पाच दिवसांत पूल सरकारने सुरू केला नाही तर शिवसेना स्वतःच्या पद्धतीने जनतेसह या पुलाचे उद्घाटन करेल."

यावेळी आंदोलनस्थळी पुणे मनपा चे प्रकल्प अधिकारी उपस्थित होते त्यांनी येत्या ४ दिवसात सर्व कामे पूर्ण करून हा उड्डाणपूल सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिले.

या आंदोलनात शहर प्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, उपशहर प्रमुख भरत कुंभारकर, महिला आघाडीच्या पदमा सोरटे, सचिन पासलकर, संतोष गोपाळ, नितीन वाघ, महेश मते, गोकुळ करंजवणे, अनंत घरत, किशोर राजपूत, महेश पोकळे, अमोल दांगट, सूरज लोखंडे, वैभव हनमघर, पराग थोरात, दिलीप पोमन, राजाभाऊ चव्हाण, शिवा पासलकर, नाना मरगळे, नागेश खडके, प्रसाद गिजरे, मिलिंद पत्की, उमेश सुर्वे, अरुण घोघरे, दत्ता घुले, संग्राम गायकवाड, निलेश वाघमारे, महेश विटे, गणपत खटपे, धनंजय खाडे, प्रथमेश भुकन, कल्पेश वाजे, केतन शिंदे, विनायक नलावडे, आकाश यादव तसेच मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# राजगुरुनगर नगरपरिषदेच्या निवडणुकीचे बिगुल वाजणार

**किरण खुडे**


• शहरातील दहा प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध - ३१ ऑगस्ट पर्यंत हरकती

राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)

येथील राजगुरुनगर नगरपरिषदेच्या निवडणुकीचे बिगुल लवकरच वाजणार असून शहरातील दहा प्रभागांची प्रारूप रचना प्रसिध्द करण्यात आली. प्रारूप प्रभाग रचनेवर ३१ ऑगस्ट पर्यंत नागरिक, मतदारांना हरकती, सुचना नोंदविता येणार आहेत. अशी माहिती मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांनी दिली.

शहरातील दहा प्रभागातून २१ नगरसेवक निवडून जाणार आहेत. त्यातील समतानगर, माळीमळा परिसरातील प्रभाग क्रमांक ७ मधुन ३ आणि इतर प्रभागातून प्रत्येकी दोन नगरसेवक निवडून जाणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयातून प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप प्रभाग रचनेचा सर्वसाधारण परिसर आणि कंसात मतदार संख्या पुढीलप्रमाणे - प्रभाग क्रमांक १ (२९२३) - थिगळस्थळ, पांडुरंगनगर. प्रभाग क्रमांक २ (२५६२) - पडाळवाडी. प्रभाग क्रमांक ३(२७९०) - चव्हाण मळा, जुना मोटार स्टँड. प्रभाग क्रमांक ४(२६०७) - स्वामी समर्थ कॉलनी, टेल्को कॉलनी नंबर १. प्रभाग क्रमांक ५(२५०२)- टेल्को कॉलनी नंबर २ आणि ३. प्रभाग क्रमांक ६( २४६७)- समृद्धीनगर, वाळुंजस्थळ. प्रभाग क्रमांक ७ (४४१८) - समतानगर, माळीमळा. प्रभाग क्रमांक ८(३०७७) - राजगुरुवाडा, ब्राह्मण आळी. प्रभाग क्रमांक ९(२५३७) - बाजारपेठ, आझाद चौक. प्रभाग क्रमांक १०(२७००) गढई मैदान परिसर. सन २०१४- १५ मध्ये राजगुरुनगरला नगरपरिषद अस्तित्वात आली. पहिली निवडणुक झाली. मात्र मुदत संपून जवळपास तेवढाच कालावधी गेला तरी निवडणुका जाहीर झाल्या नाही. राजगुरुनगर शहरात पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठी कोट्यवधी रुपये खर्च झाले. मात्र अजुनही नागरिकांना शुध्द पाणी पुरवठा होत नाही. सांडपाणी, कचरा व्यवस्थापन रामभरोसे आहे. नगरपरिषेदेच्या व्यवस्थापनावर नागरिकांची प्रचंड नाराजी आहे. गेल्या काही वर्षात नागरिक व महिलांनी कित्येकदा पाण्यासाठी आंदोलन केली, असून त्यांच्या तक्रारींचे निवारण होत नाही.

# सोमैय्या विद्याविहार विद्यापीठाने एमए कला इतिहास आणि दृश्य अभ्यास केले सुरू




**मैय्या विद्याविहार विद्यापीठाच्या डॉ. शांतिलाल के. सोमैय्या स्कूल ऑफ आर्टचे संचालक अभय सरदेसाई म्हणाले की , "डॉ. शांतीलाल के. सोमैया स्कूल ऑफ आर्टमध्ये, आम्ही कला शिक्षणाला परंपरा आणि नवोपक्रम यांच्यातील दुवा म्हणून पाहतो. कला इतिहास आणि कला लेखन आणि टीका या विषयातील आमच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांद्वारे, आम्ही विद्यार्थ्यांना विविध सांस्कृतिक अभिव्यक्तींसह समीक्षक म्हणून सुसज्ज करतो आणि त्यांच्या विश्लेषणात्मक आणि सर्जनशील कौशल्यांना वृद्धिंगत करतो. भारत आणि भारताबाहेर कला आणि संस्कृतीसंदर्भातील चर्चांना, विचारांना नवे स्वरूप देणारे विचारवंत, लेखक आणि क्युरेटर्स तयार करणे, त्यांची जोपासना करणे, हा आमचा मूळ उद्देश आहे.**

पुणे (दै. आरंभ पर्व)

सोमैय्या विद्याविहार विद्यापीठाचे डॉ. शांतीलाल के. सोमैय्या स्कूल ऑफ आर्ट भारतातील कला आणि मानविकी शिक्षणाच्या लँडस्केपची पुनर्परिभाषा करत आहे, ज्यामध्ये पदव्युत्तर आणि उदार कला कार्यक्रमांचा एक विशिष्ट पोर्टफोलिओ आहे जो कठोर शिष्यवृत्ती आणि तल्लीन, वास्तविक-जगातील सहभागाची जोड देतो. या दृष्टिकोनाच्या केंद्रस्थानी एमए कला इतिहास आणि दृश्य अभ्यास कार्यक्रम आहे. हा कार्यक्रम मुंबईचा या क्षेत्रातील पहिला एमएफए-ट्रॅक उपक्रम आहे जो विद्यार्थ्यांना जागतिक कला परिसंस्थेत भरभराटीसाठी आवश्यक असलेली कौशल्ये, उद्योग कनेक्शन आणि सांस्कृतिक प्रवाहाने सुसज्ज करतो. हा अभ्यासक्रम या शैक्षणिक वर्षापासून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

एमए कला इतिहास आणि दृश्य अभ्यास हा शैक्षणिक खोली आणि व्यावसायिक तल्लीनतेच्या अद्वितीय मिश्रणासाठी ओळखला जातो. विद्यार्थ्यांना भारतीय, दक्षिण आशियाई, युरोपियन, अमेरिकन आणि आफ्रिकन दृष्टिकोनातून कलेशी गंभीरपणे संवाद साधण्याचे प्रशिक्षण दिले जाते, ज्यामुळे पारंपारिक शिष्यवृत्ती आणि समकालीन पद्धतींमधील अंतर कमी होते.

चार वर्षांचा हा बॅचलर प्रोग्राम विद्यार्थ्यांना मानववंशशास्त्र, साहित्य, इतिहास, तत्वज्ञान, क्षेत्र/ आशियाई अभ्यास आणि राज्यशास्त्र यासारख्या क्षेत्रात प्रमुख शिक्षण घेण्यास अनुमती देतो, चर्चासत्रे, तज्ञ व्याख्याने आणि जवळून मार्गदर्शनाद्वारे चौकशी, टीकात्मक विचार आणि संवाद कौशल्ये वाढवतो. या पायावर उभारलेला, २०२५-२०२६ मध्ये सुरू होणारा दोन वर्षांचा मास्टर्स प्रोग्राम, इतिहास, मानववंशशास्त्र, क्षेत्र अभ्यास आणि भारतीय आणि जागतिक साहित्य यासारख्या विषयांचा सभ्यता आणि टीकात्मक दृष्टिकोनातून सखोल शोध देतो, ज्यामध्ये पहिल्या सत्रात मौलिक ग्रंथांचे बारकाईने वाचन आणि सर्जनशील-विश्लेषणात्मक प्रतिसादांवर लक्ष केंद्रित केले जाते. दोन्ही पदव्या पदवीधरांना शैक्षणिक, सांस्कृतिक संस्था, प्रकाशन, नागरी सेवा, मुत्सद्देगिरी, मीडिया आणि त्यापलीकडे करिअरसाठी तयार करतात, त्यांना आंतरविद्याशाखीय प्रवाह, संशोधन कौशल्य आणि जागतिक आणि प्रादेशिक समस्यांसह विचारपूर्वक सहभागी होण्याची क्षमता प्रदान करतात.

एमए कला इतिहास आणि दृश्य अभ्यास हा एक कार्यक्रम आहे जो मानववंशशास्त्र, साहित्य, लिंग अभ्यास, सेमियोटिक्स आणि समाजशास्त्र यांच्यातील छेदनबिंदूंचा शोध घेत असताना शास्त्रीय, आधुनिक आणि समकालीन काळात भारताच्या कलात्मक वारशाचा मागोवा घेतो. विद्यार्थ्यांना अभिलेखागार आणि क्युरेटोरियल प्रशिक्षण मिळते, मूळ संशोधन केले जाते आणि कला प्रकार कसे विकसित होतात आणि काळ आणि संस्कृतींमध्ये अर्थ कसा संप्रेषित करतात याचे परीक्षण केले जाते. एकत्रितपणे, या पदव्युत्तर पदव्या कला इतिहासकार, समीक्षक, क्युरेटर आणि सांस्कृतिक धोरण नेत्यांच्या पुढील पिढीला विकसित करण्यासाठी एसयूव्ही ला एक केंद्र म्हणून स्थान देतात.

# महिला आणि तरुणांना स्वातंत्र्य दिले तर ते कर्तृत्व सिद्ध करतात : गोपाळदादा तिवारी

पुणे (दै. आरंभ पर्व)

भारतातील लोकशाही व्यवस्थेमुळे व बँकांच्या राष्ट्रीयकृत घोरणांमुळे भारत आज विकसनशील देशांपैकी एक आहे. मात्र स्वातंत्र्यवेळी देशातील साक्षरतेचे प्रमाण खूप कमी होते. कालांतराने राजीव गांधी यांच्या काळात देशात रोजगार पुरक शिक्षण व्यवस्था व संगणक व इंटरनेट क्रांती झाली. अन् डिजिटल इंडियाची पायाभरणी झाली. यातून आपल्याला दिसून येते की देशात महिला आणि तरुणांना स्वातंत्र्य दिले तर ते कर्तृत्व सिद्ध करतात, असे मत काँग्रेसचे ज्येष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी व्यक्त केले.



शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत संगणक आणि सॉफ्टवेअर कौशल्य प्रशिक्षण देणाऱ्या एन. एम. डी . प्रा. लि. आणि एन. एम. डी. इन्फॉटेकच्या आठव्या वर्धापन दिनी ते बोलत होते. यावेळी आमदार विक्रमसिंह पाचपुते, राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्त्या रुपाली ठोंबरे पाटील, श्रॉफ ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि चेअरमन जे. पी. श्रॉफ, वरिष्ठ पोलिस अधिकारी पी. आय वाघमारे, एनएमडी ग्रुपचे संस्थापक नवनाथ मोहन दरेकर, प्रशांत दरेकर आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना गोपाळदादा तिवारी म्हणाले, नुकतेच झालेल्या सिंदूर ऑपरेशन मधील कर्नल सोफिया असेल किंवा येथे शेतकऱ्यांच्या मुलांना पाठबळ देणारा नवनाथ दरेकर सारखा तरुण असेल त्यांनी हे दाखवून दिले आहे. त्यामुळे सर्व सामान्य शेतकरी कुटुंबातील तरुणांना आपल्या स्वप्नांना आकार देण्याचे बळ लाभले.

अभिनेत्री प्रार्थना बेहेरे म्हणाली, मी जेव्हा जेव्हा परराज्यात किंवा परदेशात जाते तेव्हा मराठी उद्योजक दिसत नाही. मराठी माणूस उद्योक, व्यावसाव करू शकत नाही, असं बोललं जात पण आज मला मराठी असल्याचा अभिमान वाटतोय. एक वेगळीच पॉझिटिव्ह एनर्जी आज येथे मिळाली आहे.

नवनाथ दरेकर म्हणाले, डिजीटल युगात काम करत असताना सामाजिक बांधिलकी म्हणून शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत संगणक आणि सॉफ्टवेअर कौशल्य प्रशिक्षण देण्यास सुरूवात झाली. या दरम्यान अनेक शेतकरी पालकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या त्यामुळे आपण योग्य काम करतोय याची खात्री झाली. पुढील काळात आणखी शेतकऱ्यांच्या मुलांना मदतीचा हात कसा देता येईल याचा प्रयत्न असेल.

प्रशांत दरेकर म्हणाले, नवनाथ यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील एका खेड्यांत शालेय शिक्षण घेतले. पुढे पुण्यात येऊन कष्टाने स्वतचे वेगळे स्थान निर्माण केले, नाव कमावले. आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून ट्याने शेतकऱ्यांच्या मुलांसाठी मोफत तंत्रज्ञान प्रशिक्षण देण्याचा अभिनव उपरं राबविला, यातून हजारो कुटुंबाचा टॉ आधार बनला आहे, त्यांची वाटचाल पुढेही अशीच सुरू राहो अशा सदिच्छा त्यांनी दिल्या.

याप्रसंगी यशस्वी विद्यार्थ्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिभा पाटील यांनी केले.

# पोळा, मातृदिन - पिठोरी अमावस्या

(दै. आरंभ पर्व)

सन्मित्र मंडळ, गोरेगाव संचालित व विद्याभारतीशी संलग्न नूतन शिशू वाटिकेत आज पिठोरी अमावस्या म्हणजेच बैलपोळा ह्या सणाच्या निमित्ताने निसर्ग पूजन, मातृपूजन आणि भारतमाता पूजन असा कार्यक्रम आयोजित केला होता. मातृपूजन आणि निसर्गपूजन हा विषय मुख्याध्यापिका सौ. नंदिनी भावे यांनी मांडला , तर भारतमाता पूजन हा विषय मी मांडला. शिशू आणि त्यांचे पालक ह्यांच्यासोबत एकत्र हा विषय मांडायचा ही तारेवरची कसरत होती, पण विद्यार्थी आणि पालक ह्यांच्याशी संवाद साधण्याच्या संधीची मी वाटच पहात असतो, कारण समाजात किंवा देशात कोणताही आमूलाग्र बदल घडवून आणायचा असेल तर विद्यार्थी ( युवाशक्ती) आणि महिला ( मातृशक्ती) हेच वाहक राहतात. एक जिजामाता आणि एक शिवाजी महाराज केवळ सामान्य मावळ्यांना सोबत घेऊन हिंदवी साम्राज्य उभे करू शकतात ही त्याचीं प्रचिती आहे.

कार्यक्रमाच्या निमित्ताने मी मांडलेले काही मुद्दे.



- जसे नंदिनीताईंनी आता लहान मुलांना मातृपूजनाचे महत्व सांगितले तसेच आपल्या मोठ्यांसाठी आपल्या आई बरोबर आणखी एका भारत मातेची काळजी कायम घ्यायची आहे.
- साधारणपणे देश किंवा राष्ट्र म्हटलं की त्या भूभागातील मनुष्य, प्राणिमात्र, संपूर्ण सजीव सृष्टी ह्याचा विचार होतो, पण आपण भारतीयांनी त्यापुढे जाऊन या देशाला भारतमाता म्हणजे मातेच्या रूपात बघतो, हे मोठे वेगळेपण आहे. इथल्या नद्यांनाही आपण माता म्हणतो.
- आपली माता कशी आहे, सुजलाम, सुफलाम, सुरक्षित, विविधतेनी नटलेली, पण आपण तिच्याप्रती भोग भावनेनं नाही तर त्याग भावनेने बघतो, म्हणून माता.
- हिला आपण देवभूमी म्हणतो, कारण खरच या भूमीतून आपल्याला सर्व काही मुबलंग मिळतंय, आणि इथे नांदलेल्या हजारो वर्षांच्या संस्कृतीमुळे ही आपली धर्मभूमी आहे, आणि आपली तीच आपली कर्मभूमीही आहे.
- जर संपूर्ण पृथ्वी आपण एक कुटुंब मानले तर भारत ही एक माता आहे आणि पृथ्वी म्हणजे शरीर मनालें तर भारत हा त्याचा आत्मा आहे.
- स्वामी विवेकानन्द १८९७ मध्ये म्हणाले होते की आपण पुढील ५० वर्ष भारतमाता ह्या एकाच देवीचे पूजन केले पाहिजे.
- आपली पिढी ही स्वातंत्र्यानंतर जन्मलेली पिढी आहे, त्यामुळे आपल्याला भारतमातेची सेवा म्हणजे तिचे सर्व आक्रमणापासून रक्षण आणि तिच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले पाहिजेत.
- प्रत्येक जण सीमेवर जाऊ शकेल असे नाही, पण आपण दैनंदिन छोट्या छोट्या गोष्टीतून देशाचे रक्षण आणि उन्नती करू शकतो, जसे पर्यावरणाचे रक्षण, नागरी शिष्टाचाराचे काटेकोर पालन, भष्टाचार मुक्त व्यवहार इ.
- भारतमाता पूजन हा एक दिवसाचा संस्कार किंवा पूजा आहे पण आपण त्याचे पालन वर्षभर करायचे आहे.

आपण करताना जे मुले पाहतील ते त्यांच्यात रुजेल. ह्या संवादानंतर मी "देश हमे देता है सबकूच, हम भी तो कुछ देना सीखे" ह्या गीताचे पाहिले कडवे सांघिक घेतले, ज्याला मुलानी आणि पालकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

ह्यानंतर आलेल्या सर्वांनी भारतमाता पूजन केले, समोरील कुंडात प्रातिनिधिक दान दिले. त्यानंतर;निसर्गातील पाच तत्त्वांचे अग्नी ( समई), वायू ( शंख ), जल ( कलश) , पृथ्वी ( तुळशीची कुंडी) व आकाश ( घंटा) आलेल्या सर्व मुलांनी प्रातिनिधिक पूजन केले. मी ही प्रथमच असे निसर्ग पूजन केले. निसर्गाची आरती म्हणून आणि बुंदीच्या लाडवांचा प्रसाद खाऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

जनसेवा ही ईश्वरभक्ती बोध
यातला उमजूया |
विश्वासाने बंधुत्वाचे नाते सर्व सांगूया ||

**© अजित वर्तक, गोपू.**
**HSS - हरित , स्वच्छ, सुरक्षित**
**गोरेगाव ८०९७७९६०७०**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.